वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे
महाराष्ट्र शासन
स्वंतत्र्याचा अमृत महोत्सव

# उपवनसंरक्षक, नांदेड वनविभाग, नांदेड यांचे कार्यालय

गांधी पुतळयामागे, चिखलवाडी कार्नर, नांदेड. ४३१६०१ दुरध्वनी क्र.०२४६२-२३५५६२ फॅक्स नंबर ०२४६२-२४६५५६ ई-मेल-**dycfnanded@mahaforest.gov.in**

**ईमेल-व्दारे** फक्त

**विषय** :-जिल्हा सिमा लोहा-कंधार-मुखेड-एकलारा-खानापुर-नरंगल-सगरोळी-बिलोली-कोंडलवाडी-धर्माबाद ते राज्यसिमा रस्त्याचे पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरण करणे प्ररामा-16 आणि रामा-268/प्ररामा-16 कि.मी. 297/400 ते खानापुर फाटा कि.मी. 371/900 जिल्हा नांदेड वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत वनजमीनीच्या 13.20 हे आर प्रस्तावातील त्रूटी पुर्तता केले बाबत.

जा.क्र.नांववि/जमीन/रस्ता/ 767 /सन 2022-23
नांदेड – 431601 दिनांक 19 /05/2022

प्रति,
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

संदर्भ :- 1. आपले कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.काआनां/2021-22/3990/प्र. दिनांक 26/01/2021 (प्रस्ताव प्राप्त दिनांक 04/08/2021)
2. या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.अ/जमीन/एफसीए/543/2021-22 दिनांक 25/08/2021
3. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.अ/जमीन/प्र.क्र.43/21-22/2027 दिनांक 31/08/2021
4. या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.नांववि/जमीन/2264/21-22 दिनांक 01/09/2021
5. या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.नांववि/जमीन/296/22-23 दिनांक 21/04/2022 **(शेवटचे स्मरणपत्रे-5)**
6. आपले कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.काआनां/2022-23/3453 दिनांक 21/04/2022 (प्रस्ताव प्राप्त दिनांक 04/05/2022)

--------

उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक 1 अन्वये विषयाकिंत बाबत जिल्हा सिमा लोहा-कंधार-मुखेड-एकलारा-खानापुर-नरंगल-सगरोळी-बिलोली-कोंडलवाडी-धर्माबाद ते राज्यसिमा रस्त्याचे पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरण करणे प्ररामा-16 आणि रामा-268/प्ररामा-16 कि.मी. 297/400 ते खानापुर फाटा कि.मी. 371/900 जिल्हा नांदेड रस्त्याची सुधारणा करणे या रस्त्याच्या कामासाठी आवश्यक वन जमीनीचे भूसंपादनाबाबत रस्त्याचे पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरण करणे बाबत वनक्षेत्रातील मौजे आंबुलगा, सावरगाव निपानी, कौडग्याळ या गावचा रस्त्याचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केला होता. सदर प्रस्तावाची तपासणी करून पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी संदर्भिय पत्र क्रमांक 2 अन्वये मा. मुख्य वनसंरक्षक प्रा. औरंगाबाद यांचे कडे 5 प्रतित सादर केला होता. परंतु संदर्भिय पत्र क्रमांक 3 अन्वये त्यामध्ये 1 ते 6 मुदयाची त्रूटीची पुर्तता करून सुधारित प्रस्ताव सादर करणे बाबत या कार्यालयास कळविण्यात आले होते. त्यानूसार संदर्भिय पत्र क्रमांक 4 अन्वये 1 ते 6 मुदयाची त्रूटीची पुर्तता करून सुधारित प्रस्ताव या कार्यालयास सादर करणे बाबत कळविण्यात आले होते तसेच त्याबाबत 5 स्मरणपत्रे सुध्दा देण्यात आले होते.

त्यानूसार संदर्भिय पत्र क्रमांक 6 अन्वये विषयाकिंत बाबत चा प्रस्ताव ऑनलाईन व ऑफलाईन या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. प्राप्त प्रस्तावाची तपासणी केली असता त्यामध्ये पुनश्चः खालील प्रमाणे त्रूटीची पुर्तता न करता प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला असल्याने खालील नमूद केलेल्या त्रूटीची पुर्तता तात्काळ करून सुधारित प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात यावा. तसेच या कार्यालयास प्राप्त झालेल्या अहवाल 5 प्रतीत यासोबत जोडून परत करण्यात येत आहे.

1. वनभंगाबाबतचा अहवाल विहीत नवीन प्रपत्रात सादर करणे बाबत कळविण्यात आले होते परंतु नवीन प्रपत्रात सादर न करता जून्या प्रपत्रात सादर केला आहे.
2. प्रस्तावा सोबत Cronology of Events परिपूरण भरून सादर करण्यात आलेली नाही.
3. पर्यायी वनीकरण अंतर्गत चे गाव नकाशावर कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरी केलेली नाही.
4. पर्यायी वनीकरण चे केएमएल फॉईल Proparties मध्ये Range, Round, Beat नमूद केलेले आहे.

तरी, वर नमूद केलेल्या 1 ते 4 त्रूटीची पुर्तता करून सविस्तर परिपूर्ण प्रस्ताव ऑनलाईन व ऑफलाईन, सॉफट व हॉर्ड कॉपीसह सीडीसह या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा जेणे करून या कार्यालयाकडून पुढील आवश्यक ती कार्यवाही करून सदरचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास वेळेत सादर करणे सुलभ होईल.

**<u>सहपत्र :-</u>** वरीलप्रमाणे

( केशव वाबळे )
उपवनसंरक्षक,
नांदेड वनविभाग, नांदेड

प्रतिलिपी :- मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रस्थ अधिकारी), म. रा. नागपुर यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रतिलिपी :- मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रतिलिपी :- मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रतिलिपी :- अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना माहितीस्तव व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
प्रतिलिपी :- सहाय्क वनसंरक्षक (तेंदु व कॅम्पा) नांदेड यांना माहितीस्तव व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव रवाना.
प्रतिलिपी :- वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), मुखेड यांना माहितीस्तव व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव रवाना.

2/- जायमौक्यावर संबंधित यंत्रणेकडून विनापरवानगी सदर रस्त्याचे काम होणार नाही व वनसंवर्धन अधिनियम 1980 चे कायदयाचा भंग होणार नाही यांची दक्षता घ्यावी. तसेच प्रकल्प यंत्रणेकडून वर नमूद रस्त्याचे विनापरवानगी कामादरम्यान वनसंवर्धन अधिनियम 1980 चे कायदयाचा भंग झालेला असल्याने केंद्र शासन, पर्यावरण व जलवायु परिवर्तन, मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडील Handbook मधील परिच्छेद क्रमांक 1.21 अनुसार विनिदीष्ट कार्यवाही करून तसा वनभंगाबाबतचा विहीत प्रपत्रातअहवाल अदयाप पर्यत या कार्यालयास सादर केलेला नाही अत्यंत गंभीर स्वरूपाची बाब आहे. तरी, वनभंगाबाबत संबंधिता विरूध्द केलेल्या कारवाईचा अहवाल न चुकता या कार्यालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी. सदर बाबतीत भविष्यात काही पेचप्रसंग निर्माण झाल्यास त्यासआपण स्वत: व्यक्तीश: जबाबदार राहाल यांची नोंद घ्यावी.